माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३५२०**

**अपिलार्थी श्री. दिनेशसिंग विठ्ठलसिंग शितल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (फ-कार्यासन)**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.१०.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.१०.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०४.२०२२ | ०५.०५.२०२२/०६.०६.२०२२/ २२.०७.२०२२ | ०३.०६.२०२२ | २१.०७.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०९.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये समाधान झालेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.०५.२०२२ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २१.०७.२०२२ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २२.०४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"कै. विठ्ठलसिंग शितल हे तत्कालिन अधिष्ठाता डॉ. सुनिल घाटे आणि डॉ. प्रेम झंवर यांच्या चुकीच्या निर्णया विरोधात कोणत्या वरीष्ठ प्राधिकाऱ्याकडे अगर सक्षम प्राधिकरणाकडे कोणत्या कायद्यान्वये आणि नियम व तरतुदी व शासन परिपत्रकानुसार विहीत मुदतीत अपील करणे नियमात अभिप्रेत आहे त्या विहीत मुदतीत अपिल करण्याच्या अभिप्रेत असलेल्या कायदयाची व नियम व तरतुद असलेली तसेच शासन परिपत्रकाची माहितीची छायांकित प्रत मिळणे."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०५.२०२२ रोजी अपिलार्थींचा माहिती अर्ज डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,

..२/-

सोलापूर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले.

४. जन माहिती अधिकारी, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर व जन माहिती अधिकारी, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी दि. ०६.०६.२०२२ रोजी अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिली.

५. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०३.०६.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर यांनी दि.२१.०७.२०२२ रोजी अपिलार्थी श्री. दिनेशसिंग विठ्ठलसिंग शितल यांनी मा. संचालनालय यांचे पत्र संवैशिवस/छशिमसरुसो/तक्रार/७फ/२०१६/१९७६९ दि. १४.०९.२०१६ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने दि. २२.०४.२०२२ रोजीच्या जोडपत्र "अ" नुसार मागणी केल्याप्रमाणे तत्कालिन अधिष्ठाता डॉ. सुनिल घाटे अणि डॉ. प्रेम झंवर यांच्या चुकीच्या निर्णया विरोधात कोणत्या वरीष्ठ प्राधिकाऱ्याकडे अगर सक्षम प्राधिकरणाकडे कोणत्या कायद्यान्वये आणि नियम व तरतुदी व शासन परिपत्रकानुसार विहित मुदतीत अपील करणे नियमात अभिप्रेत आहे. त्या कायद्याची व नियम व तरतुद असलेली तसेच शासन परिपत्रकाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी श्री. शितल यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेशित केले.

६. जन माहिती अधिकारी, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर यांनी दि.२२.०७.२०२२ रोजी अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिली.

७. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असुनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींचा विषय शासकीय जन माहिती अधिकारी, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर व जन माहिती अधिकारी, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर या कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपिलार्थींचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये संबंधीत कार्यालयाकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले व संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे सुनावणी नंतर दि. २२.०७.२०२२ रोजी अधीकची माहिती अपिलार्थींना दिलेली आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

12-10-2026

**मुंबई**
**दिनांक : १२.१०.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**